## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार )

जा.क्र. ८१० / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १० / १२ / २०१६

**१) चारचाकी वाहनाची मोटार सायकलला धडक दिल्याने गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २२/१०/२०१६ वा. १५.१५ वा. दर. यातील जखमी इनाम अब्दुल कलाम शेख वय ४६ वर्ष, रा. गुरुनानक वार्ड तुमसर हा देव्हाडी मार्ग तुमसर डांबरी रोडाने आपले मोटार सायकल क्र. एमएच ३६ यु २२९२ ने घरी परत जात असता त्यांचे मागेहुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकलला मागेहुन धडक मारुन जखमीला जबर दुखापत व फॅक्चर करुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. गोंडाणे यांचे चौकशी अहवाल व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. सहकलम १३४/१८७,१८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाणे पोस्टे तुमसर हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन मोबाईलचे सिम कार्ड का मागीतले याकारणावरुन भांडण करुन काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०९/१२/२०१६ रोजी २०.०० वा. दर. यातील दोनी आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी हा घरी हजर असतांना फिर्यादीचे घरा समोर येवुन तुम्ही माझ्या आईला मोबाईलचे सिम कार्ड का मागीतले आहे. या कारणावरुन फिर्यादी सोबत भांडण व शिविगाळ करुन शिवबांभळीचे काठयांनी फिर्यादीचे डावे बाजुचे डोळयाखाली मारुन जखमी करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी टिकाराम दुधाराम भाजीपाले वय २४ वर्ष रा. सावरला यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. पटले पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) चारचाकी वाहनाच्या साहयाने बकऱ्यांची चोरी . :–**

दिनांक ०८/१२/२०१६ वा. २४.०० वा. दर. यातील फिर्यादी बळीराम लखन बसीने वय ७५ वर्ष रा. खुंटसावरी यांनी आपल्या घरी व शेजारी गुलाब सिंग लिल्हारे यांचे घराचे छपरात बांधलेले ०३ बकरे व ०५ बकऱ्या असे एकुण किंमती २०,०००/–रु. च्या कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्यांची संधी साधुन चारचाकी वाहनाचे साहयाने चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निरगुडे पोस्टे मोहाडी हे करीत आहेत.

**४) बिना पास परवाना ०६ ब्रास रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०८/१२/२०१६ वा. ७.२० वा. दर. यातील बस आगार पवनी ते निलज रोडवर अवैद्यरेती तपासणी थांबण्यासाठी लावलेले महसुल विभाग(तहसील कार्यालय पवनी) येथील कर्मचाऱ्यांनी यातील आरोपीतांनी आपले ताब्यातील ट्रक घेवुन जात असतांना त्यांना थांबवुन रेती परवाना विचारणा केली असता त्यांचे कडे परवाना न मिळुन आल्याने त्यांनी फिर्यादी यास कडविल्यावर फिर्यादी हे चेक पोस्ट वर येतांना यातील ट्रक चालक व मालक हे दोन्ही चोरीने रेती भरलेले ट्रक प्रत्येकी ०६ ब्रास रेती कि. २४,०००/–रु. ची घेवुन पळतांना पोलीस कर्मचाऱ्यांनी ईशारा केले असता त्यांचा ईशारा भंग करुन दोन्ही ट्रक घेवुन पळुन गेल्याने फिर्यादी सुखदेव खुशाल वासनीक वय ५४ वर्ष, रा. तहसील कार्यालय पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठारे पोस्टे पवनी हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :-

दिनांक ०९/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ८७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०३ तिन सिटर वाहनांवरती १२ केसेस व ईतर वाहनांवरती ७२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.